जागतिक ग्राहक हक्क दिन, राष्ट्रीय ग्राहक दिन व जागो ग्राहक जागो संकल्पनेवर आधारित ग्राहक जनजागृती - माध्यम आराखडा सन २०२६-२०२७.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: ग्राकनि-२०२५/प्र.क्र.४५/ग्रासं-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२.
दिनांक:- २१ जुलै, २०२६.

**वाचा:-**

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज/२०२१/प्र.क्र.१२६/का.३४, दि.१३.०८.२०२१.
२) माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि.१२ जून, २०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

जागतिक ग्राहक हक्क दिन, राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त व "जागो ग्राहक जागो" या उध्दोषणेनुसार सोप्या व प्रभावी प्रध्दतीने ग्रामीण तसेच शहरी भागात ग्राहक जनजागृती करण्यात येते. सदर जनजागृतीकरिता विभागामार्फत माहिती व जनसंपर्क, महासंचालनालयास रु. ७.५ कोटी खर्चाचा जनजागृती आराखडा प्रस्ताव सादर केला.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१३.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय जाहिराती वितरण धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामीण तसेच शहरी भागात ग्राहक जनजागृती करण्याकरिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या, माध्यम आराखडा व नियोजन समितीच्या दि.१२.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत रु.७,४८,६०,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी अठ्ठेचाळीस लाख साठ हजार फक्त) इतक्या रकमेच्या माध्यम आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये, **जागतिक ग्राहक हक्क दिन, राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त व** "जागो ग्राहक जागो" या उध्दोषणेनुसार सोप्या व प्रभावी प्रध्दतीने ग्रामीण तसेच शहरी भागात ग्राहक जनजागृती करण्याकरीता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या, माध्यम आराखडा व नियोजन समितीच्या दि.१२.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मंजूरी देण्यात आलेल्या माध्यम आराखड्यास तसेच त्याकरिता होणाऱ्या रु.७,४८,६०,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी अठ्ठेचाळीस लाख साठ हजार फक्त) इतक्या खर्चास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर माध्यम आराखडा अंतर्गत राबावयाच्या उपक्रमाचा तपशील खालील प्रमाणे राहील:-

| क्र. | माध्यम | स्वरुप | तपशील | रक्कम (प्रती नग) | संख्या | एकूण अंदाजित रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **माहिती व जनसंपर्क महासंचालनालय** | | | | | | | | |
| **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या विविध योजनांच्या व्यापक प्रसिद्धीकरिता प्रस्तावित अंदाजित माध्यम आराखडा** | | | | | | | | |
| | | | | | | | | **(विभाग पत्र दि.३ जून, २०२६)** |
| १ | निर्मिती साहित्य (Production of Creative) | **प्रिंट** | प्रिंट आणि इतर बाह्य माध्यमांकरिता जाहिरातीचा मजकूर (Adaptation, Translation, Formating from one media to other media) | १०,००० | ५ | ५०,००० | ९,००० | **५९,०००** |
| | | **टिव्हीसी विथ सेलिब्रिटी** | TVC - १० ते ६० Sec. - As per DAVP rate | २०,००,००० | ५ | १,००,००,००० | १८,००,००० | **१,१८,००,०००** |
| | **Total A** | | | | | **१,००,५०,०००** | **१८,०९,०००** | **१,१८,५९,०००** |
| **क्र.** | **Media** | **मूळ दर, प्रक्रिया** | **Details** | **वारंवारिता** | **संख्या/ दिवस** | **एकूण अंदाजित रक्कम** | **जीएसटी** | **एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित)** |
| | **इलेक्ट्रॉनिक दृक-श्राव्ये माध्यम (वृत्तचित्र शाखा)** | | | | | | | |
| १ | मनोरंजनात्मक वाहिन्याद्वारे (Entertainment Channels) जाहिरात प्रसारण | CBC (DAVP) यादीवरील व दर | १० ते ६० सेकंद जाहिरातींचे प्रसारण - प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | ४०,००,००० | ७,२०,००० | **४७,२०,०००** |
| १ | वृत्त वाहिन्याद्वारे (News Channels) जाहिरात प्रसारण | CBC (DAVP) यादीवरील व दर | १० ते ६० सेकंद जाहिरातींचे प्रसारण - प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | २५,००,००० | ४,५०,००० | **२९,५०,०००** |
| | **बाह्य माध्यमाद्वारे प्रसिद्धी (प्रदर्शने शाखा)** | | | | | | | |
| १ | पंढरपूर वारीमध्ये विभागाच्या योजनांची चित्ररथाद्वारे प्रसिद्धी | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | २५,००,००० | ४,५०,००० | **२९,५०,०००** |
| २ | पंढरपूर वारीमध्ये विभागाच्या योजनांची प्रसिद्धी LED Van द्वारे प्रसिद्धी | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | २५,००,००० | ४,५०,००० | **२९,५०,०००** |
| ३ | राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (MSRTC) बसेसवरुन (३ पॅनेलवरुन साईड अँड बॅक) योजनांची प्रसिद्धी | CBC (DAVP) यादीवरील व दर | As per DAVP - एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | ५०,००,००० | ९,००,००० | **५९,००,०००** |
| ४ | राज्यातील (महारेल) रेल्वे स्थानकांवरुन एलईडी / एलसीडी स्क्रीनद्वारे योजनांची प्रसिद्धी | CBC (DAVP) यादीवरील व दर | As per DAVP - एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | ५०,००,००० | ९,००,००० | **५९,००,०००** |
| | **समाज माध्यमांद्वारे प्रसिद्धी** | | | | | | | |
| १ | सोशल मिडीया (Social Media) | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | १,५०,००,००० | २७,००,००० | **१,७७,००,०००** |
| २ | डिजीटल मिडीया माध्यमांद्वारे प्रसिद्धी | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | १,५०,००,००० | २७,००,००० | **१,७७,००,०००** |
| | **Total - B** | | | | | **५,१५,००,०००** | **९२,७०,०००** | **६,०७,७०,०००** |
| | **Total - A + B** | | | | | **६,१५,५०,०००** | **१,१०,७९,०००** | **७,२६,२९,०००** |
| १ | शा.नि. दि. १३.८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उर्वरित रकमेवर (रु.५ कोटी वजाजाता)) प्रमाणे | शासन निर्णय तरतुदीनुसार | माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च, वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च | | | २२,३१,००० | | २२,३१,००० |
| | **TOTAL EXPENDITURE (A + B)** | | | | | **६,३७,८१,०००** | | **७,४८,६०,०००** |

३. प्रस्तुत बाबीकरिता होणारा हा खर्च "मागणी क्र.एम-३, मुख्य लेखाशिर्ष ३४५१, सचिवालयीन आर्थिक सेवा, ०९०-सचिवालय (००)(०१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (खुद्द)(अनिवार्य) लेखाशिर्ष (३४५१०१६२), २६-जाहिरात व प्रसिध्दी या उद्दिष्टाखाली सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षातील मंजूर केलेल्या तरतुदीमधून करण्यात यावा.

४. उपरोक्त खर्चास वित्तीय अधिकारी नियम पुस्तिका १९७८, शासन निर्णय क्र.रवका १०९८/५६७/प्र.क्र.२३३८/नापु-१२, दि.३०.०८.१९९८ अन्वये भाग-दुसरा, उपविभाग-चार, अ.क्र.२६, अन्वये जाहिरातीवरील खर्चाबाबत प्रशासनिक विभागास असलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत मान्यता देण्यात येत आहे.

५. प्रस्तुत प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/आदेश/परिपत्रके यानुसार तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-१०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, दि.१७.०४.२०१५ अन्वये निर्गमित नियम पुस्तिका १९७८ मधील

तरतुदींचे/अटी व शर्तींचे पालन करुन तसेच खरेदी प्रक्रियेबाबत विहित तरतूदींचे व कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२११८४४०९७४०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.07.21 18:45:05 +05'30'

**(प्रमोद पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा.मंत्री, (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे सचिव,
२) मा.राज्यमंत्री, (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
३) अपर मुख्य सचिव, (अ.ना.पु. व ग्रा.सं.वि.) यांचे स्वीय सहायक,
४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
५) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई,
६) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई,
७) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
८) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)महाराष्ट्र, मुंबई,
९) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)महाराष्ट्र, नागपूर,
१०)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१२)वित्त विभाग, (अर्थसंकल्प १६), मंत्रालय, मुंबई,
१३)सर्व उप आयुक्त (पुरवठा),
१४)सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
१५)कक्ष अधिकारी, (रोख शाखा-२ प्रती मूळ देयकासह)
१६)अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
१७)निवड नस्ती ( कार्यासन ग्रा.सं.२ )